क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/९३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २३ जून, १९९८.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १६ मे, १९९८ (शनिवार) रोजी झालेल्या ९३ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

श्र.वि.आसगांवकर 23/6/98

(श्र.वि.आसगांवकर)
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :

शासनाचे प्रधान सचिव (नवि-२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## ९३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक** : १६ मे, १९९८ (शनिवार)

**वेळ** : सकाळी १०.०० वाजता

**स्थळ** : सहयाद्री अतिथीगृह, बी.जी.खेर मार्ग,
मलबार हिल, मुंबई - ४०० ००६

**उपस्थित सदस्य** :

| | |
|---|---|
| श्री.मनोहर जोशी<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.सुरेशदादा जैन<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.राज पुरोहित<br>गृहनिर्माण राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.रा.ता.कदम<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.दिगंबर द.कांडरकर<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.विजय म.दारुवाले<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.चंद्रकांत पडवळ<br>विधानसभा सदस्य | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.पी.सुब्रह्मण्यम्<br>शासनाचे मुख्य सचिव | सदस्य |
| श्री.गिरीष गोखले<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.के.नलिनाक्षन<br>शासनाचे प्रधान सचिव<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री.व्ही.पी.राजा<br>शासनाचे सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री.रमानाथ झा<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

<u>निमंत्रित</u> :

श्री.एस्.एस्.क्षत्रिय,
उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

बैठकीच्या प्रारंभी माननीय अध्यक्षांनी प्राधिकरणाचे नवे महानगर आयुक्त व सदस्य-सचिव, श्री.रमानाथ झा यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर माजी महापौर, श्रीमती विशाखा राऊत; बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्वीच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष, सरदार तारासिंह एस्.नंद्रजोग व श्री.राम म्हात्रे; तसेच माजी विधान परिषद सदस्य, श्री.वसंत डावखरे यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा माननीय अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर प्राधिकरणाचे माजी महानगर आयुक्त व सदस्य-सचिव श्री.क.चं.श्रीवास्तव यांनी केलेल्या कार्याचा माननीय अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला व त्यानंतर प्राधिकरणाने श्री.श्रीवास्तव यांच्या सेवेची नोंद घेणारा ठराव मंजूर केला. (जोडपत्र-१)

त्यानंतर माननीय अध्यक्षांनी प्राधिकरणाचे माजी सदस्य श्री.भा.ना.आडारकर यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व त्यानंतर प्राधिकरणाने श्री.आडारकर यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव एक मिनिट स्तब्ध उभे राहून मंजूर केला. (जोडपत्र-२)

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र. १ : दिनांक १२ मार्च, १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या (९२ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे**

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक १२ मार्च, १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

२.१ कार्यवाही अहवालातील खालील बाबींवर चर्चा केल्यानंतर प्राधिकरणाने खालील निर्णय घेतले :-

(१) मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड कंपनीला नरिमन पॉईंट येथील भूखंड क्र.२४० व २४० ए हे बहुमजली वाहनतळ व व्यापारी केंद्र बांधण्यासाठी भाडेपट्टयाने देण्याच्या बाबतीत

(अ.क्र.३-बाब क्र.३) सदर कंपनीने प्राधिकरणाला पत्र पाठवून कांही मुद्दे उपस्थित केले होते व अधिमूल्याची रक्कम भरण्यासाठी ज्यास्त कालावधी मागितला होता. त्या प्रकल्पाच्या बाबतीतील एकूण परिस्थिती लक्षात घेऊन सदर कंपनीबरोबर महानगर आयुक्तांनी एक महिन्याच्या मुदतीत चर्चा/वाटाघाटी करुन सदर बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीसमोर आणावी.

(२) मे.इ.आय.एच.लिमिटेड यांना वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील बहुमजली वाहनतळ व हॉटेल यासाठी राखून ठेवलेला भूखंड भाडेपट्टयाने देण्याच्या बाबतीत (अ.क्र.४-बाब क्र.४) सदर कंपनीने प्राधिकरणास पत्र पाठवून काही मुद्यावर प्राधिकरणाकडून माहिती मागितली होती. त्यावर चर्चा करण्यासाठी त्यांना दिनांक १९/५/१९९८ रोजी प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये बोलाविले आहे असे महानगर आयुक्तांनी सांगितले. प्राधिकरणाने त्याची नोंद घेतली आणि एका महिन्याच्या मुदतीत चर्चा/वाटाघाटी करुन जरुर असल्यास ही बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीसमोर आणण्यास मान्यता दिली.

(३) वांद्रे-कुर्ला जोडमार्गाच्या मिठी नदीवरील पुलाच्या कुर्ला बाजूचा पोच मार्ग बांधण्यासाठी जरुर असलेली भूमापन क्र.३१७, सी.टी.एस.क्र.१४३ मधील ८१९.३ चौरस मीटर जमीन श्री.हफिज खैरुल्हा कुरेशी (पत्रावाला) यांच्याकडून घेणे व त्या जागेबद्दल तेवढयाच क्षेत्रफळाची जागा त्याना वांद्रे-कुर्ला समुहात देण्याच्या बाबतीत (अ.क्र.६, बाब क्र.६) कार्यवाही अहवालात नमूद केलेली परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना पूर्वी देऊ केलेल्या जमिनीऐवजी दुसरी जमीन देण्याचे मान्य करुन त्यासाठी प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.७८३</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन व त्याच्या दिनांक १२ मार्च, १९९८ च्या ठराव क्र.७७०

मध्ये अंशतः फेरफार करुन, श्री.हफिज खैरुल्हा कुरेशी (पत्रावाला) यांना कोलेकल्याण गांवातील भूमापन क्र.१७४, हिस्सा क्र.६ व हिस्सा क्र.७ मधील पूर्वी देऊ केलेल्या जागेऐवजी खालील जागा पूर्वीच्या ठरावातील बाकी प्रस्तावात दुसरे कोणतेही बदल न करता देण्यास, प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे :-

| भूमापन क्र. | हिस्सा क्र. | सी.टी.एस.क्र. | क्षेत्रफळ चौरस मीटरमध्ये |
|---|---|---|---|
| १७८ | ३८ (पीटी) | ४२०७ | ४३.६८७ |
| १७८ | ४३ (पीटी) | ४२०७ | १७१.००० |
| १७८ | ४४ (पीटी) | ४२०७ | २८१.५६१ |
| १७८ | ४५ (पीटी) | ४२०७ | २३०.१५६ |
| १७९ | ३ (पीटी) | ४२०७ | ३५.१५६ |
| १८० (पीटी) | | ४२०७ | ५७.७४० |
| | | एकूण | ८१९.३००" |

२.२ त्यानंतर, प्राधिकरणाने बाकी कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

## बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर नियोजन प्रस्तावात सामाजिक संस्था व क्रीडा संकुल यासाठी फेरबदलान्वये आरक्षण

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७८४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अन्वये वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे "उक्त अधिसूचित क्षेत्र" म्हणून संबोधिलेले) राज्य शासनाने नेमलेले विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने,

उक्त अधिनियमाच्या कलम ४०(३) सह कलम ३७(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा, तसेच या बाबतीत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण दिनांक २६ मार्च, १९९८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात व "लोकसत्ता" व "इंडियन एक्सप्रेस" या मराठी व इंग्रजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या उक्त अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर नियोजन प्रस्तावात करावयाच्या नियोजित फेरबदलाबाबतच्या नोटीसमधील सर्व म्हणजेच चारही फेरबदलांना, त्याबाबत कोणतीही हरकत वा सूचना प्राप्त न झाल्यामुळे आणि प्रस्तावित फेरबदलांमुळे कोणत्याही वैयक्तिक हितसंबंधांना बाधा येत नसल्यामुळे प्रसिध्दीपश्चात पुनर्मान्यता देत आहे व या फेरबदलांना राज्य शासनाची मंजुरी मिळविण्यासाठी ते फेरबदल राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**<u>बाब क्र.४</u> : मे.लिलावती किर्तीलाल मेहता मेडीकल ट्रस्ट यांचेकडून जादा चटई क्षेत्रासाठी बँक <u>हमीद्वारा अधिमूल्यादाखल ठेव स्वीकारण्याबाबत</u>**

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.७८५</u>** :

"असा ठराव करण्यात येत आहे की, त्याच्या दिनांक ९ सप्टेंबर, १९९६ च्या ठराव क्र.६९६ मध्ये अंशतः फेरबदल करुन मे.लिलावती किर्तीलाल मेहता मेडीकल ट्रस्ट यांना त्यांना दिलेल्या जादा चटई क्षेत्रासाठी त्यानी भरावयाच्या एकूण अधिमूल्याच्या २०% रक्कम रोखीने व शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत बाकी रक्कम बँक हमीच्या स्वरुपात देण्यास प्राधिकरण

याद्वारे मुभा देत आहे आणि याबाबतीत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**<u>बाब क्र.५</u> : मुंबई नागरी विकास प्रकल्प फिरता निधी अंतर्गत दिलेल्या कर्जावरील बांधीलकी आकार माफ करणे व विलंबित प्रदान आकारामधून सूट <u>देण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत</u>**

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.७८६</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे पोटकलम (१) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, बाब टिप्पणीच्या जोडपत्र-१ मध्ये नमूद केलेल्या सर्व नगर परिषदा/महानगरपालिका यांचेकडून येणे असलेली रु.१०,४७,९१८ इतकी बांधिलकी आकाराची रक्कम माफ करण्यास आणि ज्या नगरपरिषदांनी प्राधिकरणाला बांधिलकी आकार भरला आहे त्यांना त्यांनी भरलेली एकूण रक्कम रु.२,३२,४४३ बिनव्याजी परत करण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४ (अ) च्या पोटकलम (२) चा खंड (अ) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्रत्येक प्रकरणात १० लाख रुपयांपेक्षा अधिक नसलेला विलंबित प्रदान आकार, बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.३.३ मध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी व बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.३.४ च्या अटींच्या अधीन राहून मुंबई नागरी विकास

प्रकल्प फिरता निधीच्या कर्जदारांनी भरण्यापासून सूट देण्याचे अधिकार प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्रदान करीत आहे."

**बाब क्र.६ : कल्याण क्षेत्र विकास योजनेतंर्गत प्राधिकरणाने ताब्यांत घेतलेल्या जमिनी परत करणेबाबत**

चर्चेनंतर, विषयांकित जमीन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना पाहिजे आहे किंवा कसे याबद्दल विचारणा करावी अशी सूचना करुन, या बाबीवरील पुढील विचार लांबणीवर टाकण्यात आला.

**बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना वैयक्तिक संगणक घेण्यासाठी बिनव्याजी कर्ज देण्याबाबत**

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७८७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने त्यांच्या दिनांक १२ फेब्रुवारी, १९९८ च्या ठराव क्र.७५१ मध्ये शिफारस केल्याप्रमाणे, प्राधिकरणामध्ये ज्या कर्मचा-यांनी एक वर्ष सेवा पूर्ण केली आहे व ज्यांचे मूळ वेतन रुपये २,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा कर्मचा-यांना रुपये ४५,०००/- यापेक्षा जास्त नाही इतकी रक्कम संगणक वैयक्तिकरित्या विकत

घेण्यासाठी अग्रीम म्हणून बाब टिप्पणीच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, बिनव्याजी देण्यास, प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे."

**बाब क्र.८ : प्राधिकरणातील कर्मचा-यांना निवृत्ती वेतन व कुटुंब वेतन योजना शासनाच्या धर्तीवर लागू करण्याबाबत**

चर्चेनंतर, प्राधिकरणाने तयार केलेली निवृत्ती वेतन व कुटुंब वेतन योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठवून त्यावर शासनाच्या वित्त विभागाचे अभिप्राय घेऊन ते प्राधिकरणाकडे पाठविण्याची विनंती करावी असे ठरले.

**बाब क्र.९ : प्राधिकरणातील कर्मचा-यांच्या मुलांसाठी शैक्षणिक भत्ता मंजूरीबाबत**

प्राधिकरणातील कर्मचा-यांच्या मुलांसाठी शैक्षणिक भत्त्याबाबत प्राधिकरणाने तयार केलेला प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठवून त्यावर शासनाच्या वित्त विभागाचे अभिप्राय घेऊन ते प्राधिकरणाकडे पाठविण्याची विनंती करावी असे ठरले.

**बाब क्र.१० :** **वडाळा ट्रक टर्मिनल शहराच्या पश्चिम भागाशी जोडण्याकरिता शीव-कोळीवाडा जोडमार्ग बांधणे-जोड मार्गासाठी लागणा-या जमिनीवरील पात्र रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी इमारती बांधणे/ पायाभूत सोयींसह इमारतींची एक रकमी विक्री करणे व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या प्रकल्पाला मान्यता देणे**

१०.१ या विषयावर झालेल्या चर्चेमध्ये मुख्यतः खालील मुद्दे आले :-

(१) वडाळा भारवाहक तळ व बृहन्मुंबई यांचेमधील महत्वाचा दुवा असलेल्या शीव-कोळीवाडा जोडमार्गाचे बांधकाम प्राथम्याने करणे जरुरीचे आहे. त्यासाठी लागणा-या जमिनीवर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विनामुल्य गाळे द्यावे लागतील असे अंदाजे २७१ पात्र झोपडपट्टी रहिवाशी आहेत. त्यांचे विस्थापन करण्यासाठी प्राधिकरणाने कोकरी आगार, वडाळा येथील सी.टी.एस.क्र.६ (भाग) ते २० (भाग), २५ (भाग) आणि २६ (भाग) मधील ३.५८ हेक्टर जमीन १९९३ मध्ये व रु.४४६ लाखाची ठेव १९९१-९४ या कालावधीत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचेकडे देऊन पात्र झोपडीधारकांचे विस्थापन व पुनर्वसन करण्याची जबाबदारी त्यांचेवर सोपविली आहे.

(२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने सदर जमिनीवर प्रचलित नियम/विनियमाप्रमाणे खालील प्रमाणे गाळे बांधण्याची योजना तयार केली आहे :-

(एक) अल्प उत्पन्न गटासाठी (२२५ चौ.फूट चटई क्षेत्र असणारे) - १०३० गाळे

(दोन) उच्च उत्पन्न गटासाठी (५७० चौ.फूट चटई क्षेत्र असणारे) - ५३० गाळे

सदर योजनेचा अंदाजित खर्च ७६.५१ कोटी रुपये (एजन्सी आकारासह, परंतु व्याज इ.वगळता) आहे व उत्पन्न सुमारे ९५ कोटी रुपये आहे.

(३) सदर योजनेसाठी लागणारे सुमारे ७६ कोटी रुपये मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास महामंडळास उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत.

(४) सदर योजने अंतर्गत बांधलेल्या गाळयाचे वितरण खाली नमूद केल्याप्रमाणे करावयाचा प्रस्ताव आहे :-

(एक) अल्प उत्पन्न गटासाठी बांधावयाचे १०३० गाळे —

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | सुमारे २७१ गाळे पात्र झोपडी रहिवाश्यांना | - | विनामूल्य |
| (ब) | सुमारे ५८ गाळे सदर रस्त्यासाठी लागणा-या अपात्र झोपडी रहिवाश्यांना | - | ना नफा ना तोटा तत्वावर |
| (क) | उरलेले सुमारे ७०१ गाळे आणिक- पांजरपोळ रस्ता इ.सारख्या (पूर्व मुक्त मार्गाचा भाग) मुंबई नागरी प्रकल्प - दोन मधील रस्त्यांच्या बांधकामामुळे बाधित होणा-या पात्र रहिवाश्यांसाठी भविष्यात वापरण्यासाठी | - | विनामुल्य |

(दोन) उच्च उत्पन्न गटासाठी बांधलेले ५३० गाळे - खुल्या बाजारभावाने विक्री

— सदर गाळयांची खुल्या बाजारभावाने विक्री करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा प्रतिनिधी म्हणून काम करण्याची बाब महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या विचाराधिन आहे

— मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने सदर गाळे प्राधिकरण ठरविल त्या धोरणानुसार प्राधिकरणाच्या मान्यतेने वितरीत करावे अशी शिफारस प्राधिकरणाला केली आहे.

(५) अपात्र झोपडी रहिवाश्यांबरोबर कम्युनिटी डेव्हलपमेंट एजन्सी मार्फत संपर्क साधल्यावर त्यांचेपैकी कोणीही अल्प उत्पन्न गटासाठी बांधले जाणारे गाळे प्रस्ताविल्याप्रमाणे "ना नफा- ना तोटा" तत्वावर घेण्यास तयार नाहीत असे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे सांगण्यात आले

(६) मुंबई महानगर प्राधिकरणाने शीव-कोळीवाडा जोड रस्त्यासाठी जरुर असलेल्या जमिनीवरील पात्र झोपडी रहिवाश्यांचे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून यांना पूर्वी त्या कामासाठी दिलेल्या (कोकरी आगार, वडाळा येथील सी.टी.एस.क्र.६ (भाग) ते २० (भाग), २५ (भाग) व २६ (भाग) मधील ३.५८ हेक्टर) जमिनीवर विस्थापन करावे. तसेच जोड रस्त्यासाठी लागणा-या जमिनीवरील अपात्र झोपडी रहिवाश्यांनी व्यापलेली जमीन त्यांचे निष्कासन करुन मोकळी करण्यात यावी.

(७) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळाने तयार केलेल्या प्रकल्पासाठी लागणारे पैसे त्यांच्या पध्दतीप्रमाणे उभारावेत व उरलेल्या गाळयाचे वितरणही त्यांचे पध्दतीप्रमाणे करावे. याबाबतचा निर्णय सदर प्राधिकरणाने घ्यावा.

१०.२ या विषयावर झालेल्या आणखी चर्चेअंती प्राधिकरणाने वरील (६) व (७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्णय घेतला.

मा.अध्यक्षांच्या परवानगीने खालील दोन बाबी पटल बाबी म्हणून प्राधिकरणाने विचारात घेतल्या :-

**पटल बाब क्र.१ :-** **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प- प्राधिकरणाचे वित्तीय योगदान**

प.१.१. या विषयावर झालेल्या चर्चेमध्ये खालील मुद्दे मांडण्यात आले :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प अधिक कार्यक्षमतेने राबविण्यासाठी "शिवशाही पुनर्वसन प्रकल्प" नावाची एक कंपनी स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे व त्या कंपनीचे प्रत्येकी रु.३०० कोटी समभाग (इक्वीटी) भांडवल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी घ्यावयाचे आहे; समभागावर कंपनी डिव्हीडंड देऊ शकेल; अशात-हेने भाग भांडवल उभारल्यावर सदर कंपनी वित्तीय संस्था व खुल्या बाजारातून सुमारे ६००० ते ७००० कोटी रुपये उभारु शकेल व त्यातून डिसेंबर १९९९ पर्यंत २ लाख घरे बांधणे शक्य होणार आहे; असे सांगून मा.गृहनिर्माण मंत्री यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जरुर असलेली रक्कम भाग भांडवल म्हणून उपलब्ध करावी असे सूचविले.

(२) मा.अध्यक्षांनी सदर कंपनीस पैसे तातडीने उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे मात्र त्याचबरोबर खालील गोष्टी तपासून पहाव्या असे सांगितले :-

(एक) मुंबई महानगर प्राधिकरणाने अजून पर्यंत कर्जरुपाने किती संस्थांना किती पैसे देण्याचे कबूल केले आहे ?

(दोन) प्रस्तावित शिवशाही पुनर्वसन प्रकल्पासाठी पैसे कसे (किती पैसे कोणत्यावेळी) लागणार आहेत ?

(तीन) सदर कंपनी डिसेंबर, १९९९ पर्यंत २ लाख घरे पूरी करु शकेल याची हमी दिली पाहिजे.

(चार) सदर कंपनीने हमी दिल्यावर त्या कंपनीस लागणारे पैसे लागणाऱ्या वेळेपूर्वीच उपलब्ध होतील याची दक्षता घेतली पाहिजे

(३) राज्य शासनाच्या योजनांना लागणारा पैसा शासनानेच उपलब्ध करुन द्यावा व त्याचा भार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर पडणार नाही याची दक्षता घ्यावी असा मा.मुख्य सचिव यांनी विचार मांडला आणि त्यास प्राधिकरणाने दुजोरा दिला.

प.१.२ या विषयावर झालेल्या आणखी चर्चेत प्रस्तावित कंपनीचे बाबतीत मंत्रीमंडळाच्या आगामी बैठकीमध्ये निर्णय घेतले जाणार आहेत असे सांगण्यात आले. त्यामुळे सदर कंपनीस लागणारी रु.३०० कोटी पर्यंतची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उपलब्ध करुन द्यावी असे ठरले. मात्र सदर रक्कम राज्य शासन ठरविल त्याप्रमाणे भाग भांडवल किंवा कर्ज म्हणून द्यावी, त्याबाबतच्या अटी व शर्ती व कर्ज म्हणून रक्कम द्यावयाची असल्यास व्याजाचा दर व इतर अनुषंगिक बाबी सुध्दा राज्य शासन ठरविल त्याप्रमाणे असाव्या असेही प्राधिकरणाने ठरविले. मात्र तसे करत असताना प्राधिकरणाकडे गुंतवणूक करण्यासाठी उपलब्ध असलेला निधी व त्याबाबतीत दुसऱ्या संस्थांना देण्यासाठी कबूल केलेला निधी यांचा विचार करुनच पैसे उपलब्ध करुन द्यावेत.

प.१.३. त्यानंतर, प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला :-

<u>ठराव क्र.७८८</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमानुसार मिळालेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व

अधिकारांचा वापर करुन, शिवशाही पुनर्वसन प्रकल्पासाठी प्रस्तावित कंपनीमध्ये रुपये ३०० कोटी पेक्षा ज्यास्त नाही इतकी रक्कम राज्य शासन ठरविल त्याप्रमाणे भाग भांडवल किंवा कर्ज रुपाने गुंतविण्यास/ ठेवण्यास तसेच त्याबद्दलच्या अटी व शर्ती (ज्यामध्ये जरुर असल्यास व्याजाच्या दराचा समावेश आहे) राज्य शासन ठरविल त्याप्रमाणे ठेवण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, सदर कंपनीस मंजूर केलेल्या रकमेपर्यंत पैसे, प्राधिकरणाकडे गुंतवणूक करण्यासाठी उपलब्ध असलेला निधी व त्याबाबतीत दुस-या संस्थांना देण्यासाठी कबूल केलेला निधी यांचा विचार करुन वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र.२ : महानगर आयुक्तांना निवासी सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी तयार सदनिका विकत घेण्याबाबत**

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.७८९ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरण महानगर आयुक्तांना निवासी सदनिका

उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अंदाजे १७५० चौ.क्षेत्रफळाची तयार सदनिका विकत घेण्यासाठी रु.२ कोटी पर्यंतच्या खर्चास याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, सदर ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

(जोडपत्र-१ व जोडपत्र-२)

********************

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९३ वी बैठक

दिनांक : १६ मे, १९९८

: **ठराव** :

"श्री.क.चं.श्रीवास्तव यांनी या प्राधिकरणाचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक ९.१२.१९९६ पासून दिनांक ७.५.१९९८ पर्यत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे. श्री.श्रीवास्तव यांना त्यांचा भावी सेवा काळ उज्वलशील जावो अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

****************

जोडपत्र-२

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ९३ वी बैठक

दिनांक : १६ मे, १९९८

: **ठराव** :

"श्री.भास्कर नामदेव आडारकर यांचे दिनांक २० मार्च, १९९८ रोजी निधन झाले. श्री.आडारकर हे दिनांक १.२.१९७७ ते १.११.१९८२ या कालावधीत, प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण मंडळाचे अध्यक्ष या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.आडारकर यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि अकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री.आडारकर यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**************